नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १४६ Issue - 146 | वार - गुरुवार दि. २२ ऑक्टोबर २०२६ Blow- Thursday Date 22 OCTOBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# संभाव्य पाणीटंचाईचे गावनिहाय कृती आराखडे २५ ऑक्टोबरपर्यंत सादर करा

## पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील ; जलजीवन मिशनअंतर्गत ७५ ते ९९ टक्के पूर्ण झालेल्या योजना प्राधान्याने कार्यान्वित करण्याचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : नागपूर, अमरावती आणि कोकण विभागांतील संभाव्य पाणीटंचाईच्या सर्व टप्प्यांचे वस्तुनिष्ठ व गावनिहाय कृती आराखडे येत्या २५ ऑक्टोबरपर्यंत सादर करावेत. जलजीवन मिशनअंतर्गत ७५ ते ९९ टक्के प्रगती झालेल्या पाणीपुरवठा योजना प्राधान्याने पूर्ण करून कार्यान्वित कराव्यात, असे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.

मंत्री पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे बैठकीत नागपूर, अमरावती आणि कोकण विभागांतील पाणीपुरवठा योजना, भूजल पातळी आणि संभाव्य पाणीटंचाईच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. सध्या या विभागांत गंभीर पाणीटंचाई नसली, तरी आगामी महिन्यांतील संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने आतापासूनच सज्ज राहावे. अधिकारी, लोकप्रतिनिधी, सरपंच आणि ग्रामपंचायतींशी चर्चा करून तसेच प्रत्यक्ष पाहणीच्या आधारे कृती आराखडे तयार करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. जलजीवन मिशनअंतर्गत अंतिम टप्प्यात असलेल्या योजनांची पाइपलाईन, पंप, वीजजोडणी, रोहित्र आदींची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावीत. ७५ टक्क्यांपेक्षा अधिक प्रगती झालेल्या योजनांची पॅकेजविषयक माहिती पूर्ण करून प्रमाणित करावी, जेणेकरून निधी वितरणात अडथळे



येणार नाहीत, असेही ते म्हणाले. संभाव्य टँकरग्रस्त गावांसाठी जलस्रोत बळकटीकरणाचा स्वतंत्र आराखडा तयार करावा. जिल्हा नियोजन समितीच्या दोन टक्के निधीच्या तरतुदीतून स्रोत बळकटीकरणाची कामे प्राधान्याने हाती घ्यावीत. विहीर पुनर्भरण, शेततळी, सिमेंट बंधारे, सिमेंट प्लग, सलग समतल चर आणि जुन्या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीची कामे करावीत. आवश्यक कामांसाठी जिल्हा नियोजन, खनिज आणि सामाजिक उत्तरदायित्व निधीतूनही नियोजन करावे, असे मंत्री पाटील यांनी सांगितले. पाणीटंचाई निवारणासाठी टँकरचा वापर हा अंतिम पर्याय असावा. त्यापूर्वी उपलब्ध विहिरींची स्वच्छता व निर्जंतुकीकरण, स्थानिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन आणि पाण्याचा काटकसरीने वापर या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. पाणीटंचाईबाबत तक्रार प्राप्त झाल्यास किंवा त्यासंदर्भात बातमी प्रसिद्ध झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने गावाला भेट देऊन आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

पूर्ण झालेल्या आणि यशस्वी चाचणी झालेल्या पाणीपुरवठा योजनांचे जिल्हा परिषद किंवा ग्राम पंचायतीकडे हस्तांतरण करण्यासाठी निश्चित कालमर्यादा ठरवावी. स्थानिक संस्थांकडून योजना स्वीकारण्यास विलंब झाल्यास शासनाच्या धोरणानुसार पुढील कार्यवाही करावी. योजनांचे परिचालन, वीजदेयके आणि देखभाल यांची जबाबदारी जिल्हा परिषद व ग्राम पंचायतींनी प्रभावीपणे पार पाडावी. वीजजोडणी किंवा रोहित्रासंदर्भातील अडचणी सोडविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्याच्या सूचनाही मंत्री पाटील यांनी केल्या.

या आढावा बैठकीस नागपूर, अमरावती व कोकण विभागांतील जल जीवन प्राधिकरण, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, कार्यकारी अभियंते, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे अधिकारी तसेच पाणीपुरवठा विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजारोहणाचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निमंत्रण; मुख्यमंत्र्यांनी दिला वैविध्यपूर्ण वारसा संच भेट

नवी दिल्ली : नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या भव्य पर्वाचा शुभारंभ ठरणाऱ्या ३१ ऑक्टोबरच्या ध्वजारोहण सोहळ्याचे निमंत्रण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातील अन्य मंत्री आणि अधिकारी - पदाधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ उपस्थित होते.



राष्ट्रपती भवन येथे झालेल्या या भेटीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना येत्या ३१ ऑक्टोबर रोजी नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे आयोजित ध्वजारोहण सोहळ्याचे औपचारिक निमंत्रण दिले. महाराष्ट्राच्या आध्यात्मिक परंपरेपासून आदिवासी उद्योजकता, वस्त्रकला, कृषिसमृद्धी आणि खाद्यसंस्कृतीपर्यंतच्या वैविध्यपूर्ण वारशाची ओळख करून देणारा विशेष भेटवस्तू संचही त्यांना प्रदान केला. राष्ट्रपती यांना ध्वजारोहणाच्याच दिवशी होणाऱ्या गोदा आरती, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या संकेतस्थळाचे उद्घाटन, कुंभमेळा गीताचे लोकार्पण, कुंभमेळ्यावर आधारित कॉफीटेबल बुक आणि कुंभमेळा टपाल तिकिटाच्या अनावरणासाठीदेखील आमंत्रित करण्यात आले.

यावेळी अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा, आपत्ती व्यवस्थापन व कुंभमेळा मंत्री तथा नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन व विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ, नाशिकच्या महापौर हिमगौरी आडके-आहेर, त्र्यंबक नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार, त्र्यंबकेश्वर देवस्थानचे अध्यक्ष तथा धर्मादाय सहआयुक्त न्यायमूर्ती विवेक सोनवणे, नाशिक पुरोहित संघाचे अध्यक्ष चंद्रशेखर पंचाक्षरी, त्र्यंबकेश्वर पुरोहित संघाचे अध्यक्ष मनोज थेटे, रामतीर्थ गोदावरी सेवा समितीचे नरसिंहकृपा दास, सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम आणि कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह आदी यावेळी उपस्थित होते.

राष्ट्रपतींना सादर करण्यात आलेले निमंत्रण वैशिष्ट्यपूर्ण कलात्मक संकल्पनेवर आधारित आहे. निमंत्रण पेटी उघडताच कुंभमेळ्याची पौराणिक पार्श्वभूमी, आध्यात्मिक महात्म्य आणि भव्यता दर्शविणारी त्रिमितीय (पॉप-अप) कलाकृती उलगडते. दृष्टी, श्रवण, गंध, चव आणि स्पर्श या पंचेंद्रियांशी संबंधित अनुभवांचा समावेश असलेल्या या संकल्पनेतून नाशिकचा सांस्कृतिक वारसा, पवित्र गोदावरीचा महिमा आणि भारतीय परंपरेतील कुंभमेळ्याचे अनन्यसाधारण महत्व प्रभावीपणे अधोरेखित करण्यात आले आहे.

आदिवासी विकास विभागांतर्गत शबरी नॅचरल्सच्या उत्पादनांचा या भेटवस्तू संचात समावेश आहे. अगरबत्ती, भरडधान्यांपासून तयार केलेले खाद्यपदार्थ, मोहफुलांपासून बनविलेली उत्पादने, बांबूपासून तयार केलेल्या वस्तू आणि वनमध अशा विविध उत्पादनांतून आदिवासी समाजाचे पारंपरिक ज्ञान, नैसर्गिक संसाधनांचा सुयोग्य वापर आणि स्थानिक उद्योजकतेचे सामर्थ्य समोर येते. आदिवासी कारागिरांचे कौशल्य, स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्याचे प्रयत्न आणि समुदायांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा संदेशही या माध्यमातून देण्यात आला आहे.

महाराष्ट्राच्या वस्त्रपरंपरेचा मानबिंदू असलेल्या येवला येथील पैठणीचा या संचात समावेश करण्यात आला आहे. नाशिकच्या कृषिसमृद्धीचे प्रतिनिधित्व काळ्या मनुका आणि काजू या उत्पादनांद्वारे करण्यात आले आहे. नाशिकच्या खाद्यपरंपरेचे प्रतीक असलेल्या चिवड्याचाही या संचात समावेश आहे. यासह निवडक मिठाई आणि सुकामेव्याच्या पदार्थांचाही या भेटवस्तू संचात समावेश आहे.

# टायगर श्रॉफवरील हल्ल्याप्रकरणी तिन्ही आरोपींना 31 ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: अभिनेता टायगर श्रॉफ याच्यावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी तीन मुख्य आरोपींना मुंबई न्यायालयाने ३१ ऑक्टोबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. आरोपींना १९ ऑक्टोबर रोजी राजस्थानातील कोटा येथून मुंबईत आणण्यात आले होते. अटक करण्यात आलेल्या व्यक्तींमध्ये हरियाणातील सोनिपत येथील रेहान उर्फ सुक्का, मूळचा बिहारमधील बेगुसराईचा आणि मुंबईत राहणारा हृतिक कुर्मी उर्फ रोशन आणि हरियाणातील फुल सिंग यांचा समावेश आहे.

गुन्हे शाखेने या तिन्ही आरोपींना दंडाधिकारी न्यायालयात हजर करून पोलीस कोठडीची मागणी केली. गुन्ह्यात वापरलेली शस्त्रे हस्तगत करायची आहेत, असे तपास यंत्रणेने न्यायालयाला सांगितले आणि आरोपीने दोन फोन नष्ट केल्याचा आरोप केला. घटनेमागील कट आणि हेतू उघडकीस आणण्यासाठी कोठडी आवश्यक होती, असे पोलिसांनी एका वृत्तसंस्थेस सांगितले. तिघांच्या पोलीस कोठडीला त्यांचे बचाव वकील अजिंक्य मिर्गल आणि सत्यब्रत जोशी यांनी विरोध केला. शस्त्रे जप्त करण्यासाठी कोठडीची आवश्यकता नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला. त्यांनी



आपल्या निवेदनात हेदेखील अधोरेखित केले की, आरोपी ट्रान्झिट रिमांडवर असताना त्यांची चौकशी करण्यात आली होती. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून आरोपींना ३१ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. रविवारी (१८ ऑक्टोबर) संध्याकाळी सात वाजण्याच्या सुमारास अभिनेता टायगर श्रॉफच्या गाडीवर गोळीबार झाला. ही घटना जुहू येथील पुष्पा पार्क परिसरात घडली. टायगर श्रॉफ एका मैदानावर फुटबॉल मॅच खेळून त्याच्या कारमधून घरी परतत होता. तिथे त्याला पाहण्यासाठी चाहत्यांची मोठी गर्दी जमली होती. याच गर्दीचा फायदा घेत दुचाकीवरून आलेल्या तीन अज्ञात हल्लेखोरांनी टायगरच्या गाडीवर ५ ते ६ राऊंड गोळीबार केला आणि तिथून पळ काढला.या प्राणघातक हल्ल्यात अभिनेता सुखरूप बचावला, पण गाडीच्या चालकाला आणि चाहत्याला गोळी लागली. तीन अज्ञात तरुणांनी दुचाकीवरून येऊन हा हल्ला घडवला. दरम्यान, या प्रकरणी मुंबई पोलिस आणि कोटा पोलिस यांच्या एकत्रित तपासात तीन संशयितांना सोमवारी सकाळी राजस्थानातील कोटा येथून ताब्यात घेण्यात आले.

**पाच जागांसाठी एकूण १८२ उमेदवार रिंगणात** | **१० लाख ६८ हजार ७२ मतदार मतदानाचा बजावणार हक्क; मतदानासाठी २ हजार ४१९ केंद्रांची व्यवस्था**

# पदवीधर, शिक्षक मतदारसंघांतील प्रचारतोफा उद्या थंडावणार, २३ ऑक्टोबरला मतदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र विधान परिषदेच्या तीन पदवीधर आणि दोन शिक्षक मतदारसंघांतील द्विवार्षिक निवडणुकीच्या प्रचाराची मुदत गुरुवारी संपत आहे. छत्रपती संभाजीनगर, पुणे आणि नागपूर विभागांतील पदवीधर, तसेच अमरावती आणि पुणे विभागांतील शिक्षक मतदारसंघांसाठी शुक्रवारी, २३ ऑक्टोबरला मतदान होणार आहे.

पाच जागांसाठी एकूण १८२ उमेदवार रिंगणात असून, १० लाख ६८ हजार ७२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदानासाठी २ हजार ४१९ केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. मंगळवारी, २७ ऑक्टोबरला मतमोजणी होणार असून, ३१ ऑक्टोबरपर्यंत संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. या पाचही मतदारसंघांतील विद्यमान सदस्यांची मुदत ६ डिसेंबर २०२६ रोजी संपत असल्याने केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार निवडणूक होत आहे. मतदानाची प्रक्रिया सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत पार पडणार आहे. निवडणूक निष्पक्ष, पारदर्शक आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. पाच जागांसाठी एकूण १८२ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. छत्रपती संभाजीनगर विभाग पदवीधर मतदारसंघात ४१, पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात ४७ आणि नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात ३८ उमेदवार रिंगणात आहेत. अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात २६, तर पुणे विभाग शिक्षक मतदारसंघात ३० उमेदवार निवडणूक लढवत आहेत. पाचही मतदारसंघांमध्ये पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात सर्वाधिक ४७ उमेदवार असल्याने या मतदारसंघातील लढतीकडे लक्ष लागले आहे.

पाचही मतदारसंघांत मिळून १० लाख ६८ हजार ७२ मतदारांची नोंदणी झाली आहे. पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात सर्वाधिक ३ लाख ८८ हजार १९ मतदार आहेत. याउलट, अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात सर्वात कमी ३५ हजार ८१० मतदार आहेत. मतदानासाठी छत्रपती संभाजीनगर विभाग पदवीधर मतदारसंघात ८४२, पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात ७४१ आणि नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात ४४५ मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत.

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात ८१, तर पुणे विभाग शिक्षक मतदारसंघात ३१० मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. या सर्व केंद्रांवर मतदान सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. या निवडणुकीत छत्रपती संभाजीनगर विभाग पदवीधर मतदारसंघाचे सतीश भानुदासराव चव्हाण, पुणे विभाग पदवीधर मतदारसंघाचे अरुण गणपती लाड, नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाचे अभिजीत गोविंदराव वंजारी, अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाचे किरण रामराव सरनाईक आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाचे जयंत दिनकर आसगावकर या विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ ६ डिसेंबर २०२६ रोजी संपणार आहे. त्यामुळे या पाच जागांसाठी नव्याने निवडणूक होत असून, २३ ऑक्टोबरच्या मतदानानंतर २७ ऑक्टोबरला मतमोजणी होऊन निकाल स्पष्ट होणार आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### कलावंतांच्या सुरक्षेचा प्रश्न

मुंबईतील जुहू परिसरात टायगर श्रॉफशी संबंधित गोळीबाराची घटना घडल्याचे वृत्त १८ ऑक्टोबर २०२६ रोजी समोर आले. या घटनेनंतर बॉलिवूडमधील कलाकारांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणाचा तपास सुरू असून गोळीबारामागील कारण आणि संबंधित व्यक्तींची भूमिका यांचा शोध घेतला जात आहे.अशा घटनांमुळे मुंबईतील प्रसिद्ध व्यक्तींच्या निवासस्थानांभोवती असलेल्या सुरक्षा व्यवस्थेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. मात्र, तपास पूर्ण होण्यापूर्वी या घटनेमागील हेतूबाबत ठोस निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफशी संबंधित गोळीबाराच्या घटनेनंतर मुंबईतील सेलिब्रिटींच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर अभिनेता अक्षय कुमार याच्या जुहू येथील निवासस्थानी बुलेटप्रूफ काचेची ढाल बसवली जात असल्याचे वृत्त समोर आले आहे. या बातमीमुळे मनोरंजनविश्वात चर्चांना उधाण आले आहे. मात्र, अक्षय कुमार यांच्या घराला नेमका कोणता धोका आहे किंवा या सुरक्षाव्यवस्थेमागील अधिकृत कारण काय आहे, याबाबत स्वतंत्र अधिकृत पुष्टी उपलब्ध नसल्याने या वृत्ताकडे सावधपणे पाहणे आवश्यक आहे. अक्षय कुमारच्या जुहू येथील घराबाहेर बुलेटप्रूफ काचेची सुरक्षा ढाल बसवण्याचे काम सुरू असल्याचे सांगितले जात आहे. या सुरक्षाव्यवस्थेबाबत अधिकृत निवेदन समोर आलेले नसल्याने त्यामागील नेमके कारण स्पष्ट झालेले नाही. अक्षय कुमार हा बॉलिवूडमधील लोकप्रिय अभिनेता असून मुंबईत त्याचे वास्तव्य आहे. सेलिब्रिटींच्या निवासस्थानांवर सुरक्षेच्या दृष्टीने विविध उपाययोजना केल्या जातात. मात्र, एखाद्या विशिष्ट घटनेमुळेच ही व्यवस्था उभारली जात आहे, असे अधिकृत पुष्टीशिवाय ठामपणे सांगता येणार नाही. टायगर श्रॉफशी संबंधित गोळीबाराच्या वृत्तानंतर कलाकारांच्या सुरक्षेबाबत चर्चा वाढली आहे. अशा घटनांमध्ये पोलिसांचा तपास, संभाव्य धोके आणि सुरक्षा यंत्रणांची भूमिका महत्त्वाची ठरते.

# कार्तिकी यात्रा कालावधीत पाण्याचे सूक्ष्म आणि काटेकोर नियोजन करावे

## कार्तिकी यात्रा आढावा बैठकीत प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या सूचना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी सुमारे ८ ते १० लाख भाविक येतात. वारीच्या पार्श्वभूमीवर यंदा दुष्काळजन्य परिस्थिती लक्षात घेता, पंढरपुरात येणाऱ्या भाविकांची (वारकऱ्यांची) पाण्यासाठी गैरसोय होऊ नये तसेच वारी कालावधीत पाण्याचा तुटवडा भासू नये आणि आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पाण्याचे सूक्ष्म आणि काटेकोर नियोजन करावे अशा सूचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या.



कार्तिकी यात्रा नियोजनाबाबत प्रांताधिकारी कार्यालय, सांस्कृतीक भवन पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव, तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी प्रसन्न भातलवंडे, तसेच संबधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

यावेळी प्रांताधिकारी इथापे म्हणाले, कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून तसेच परराज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक येतात. कार्तिकी शुध्द एकादशी शनिवार दि. २१ नोव्हेंबर, २०२६ रोजी असून, यात्रा कालावधी दि. १० ते २८ नोव्हें. असा राहणार आहे. या यात्रा कालावधीत वारकरी, भाविकांना आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी योग्य नियोजन करावे, यात्रा कालावधीत नगरपालिकेने स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा मुबलक पाणी पुरवठा करावा, चंद्रभागा वाळवंटात स्वच्छता व पुरेशा प्रकाश राहिल याबाबत नियोजन करावे, शहरातील अतिक्रमणे कायमस्वरुपी काढण्याबाबत नगरपालिका व पोलीस प्रशासनाने संयुक्त पथकाची नेमणूक करावी. पाटबंधारे विभागाने नदीपात्रात पाणी सोडण्याबाबतचे योग्य नियोजन करावे. आरोग्य विभागाने मुबलक औषधसाठा उपलब्ध ठेवावा. भक्ती सागर (६५ एकर) येथील जागेची स्वच्छता करुन वीज, पाणी आदी व्यवस्थेची उपलब्धता करावी

यात्रा कालावधीत वाखरी येथे जनावरांचा बाबजार मोठ्या प्रमाणात भरत असल्याने तेथे जनावरांच्या व पशुपालकांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व पशुवैद्यकीय पथकाची नेमणूक करावी . मंदीर समितीने दर्शन रांगेत घुसघोरी होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच स्कायवॉकचे स्ट्रक्चरल ऑडिट करावे. अन्न औषध प्रशासन विभागाने खाद्य पदार्थ तसेच प्रसादाच्या दुकानाची वेळोवेळी तपासणी करावी. अशा सूचनाही प्रांताधिकारी श्री इथापे यांनी यावेळी दिल्या.

श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदीर समितीने भाविकांच्या सुलभ व जलद दर्शनाला प्राधान्य दिले असून, दर्शन रांगेत घुसघोरी होऊ नये यासाठी जादा सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात येणार आहे. दर्शन रांगेतील भाविकांसाठी स्वच्छता, पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय आदी आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात येणार असल्याचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी सांगितले. तसेच नगर पालिका प्रशासनाकडून यात्रा शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, आवश्य ठिकाणी बॅरेकेटींग, पार्कींग व्यवस्था, वेळोवेळी स्वच्छता याबाबतचे नियोजन केले असल्याचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी सांगितले.

# सांगोला तालुक्यात डॉ.बी.पी. रोंगे सरांचा दबदबा; ज्ञानयात्री डॉ. रोंगे सर विजयी होणार





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/सांगोला- राज्यातील शिक्षक मतदार संघाची निवडणूक अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली असून पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तंत्रशिक्षणातील विविध यशस्वी उपक्रमांमुळे राज्यात 'ज्ञानयात्री' म्हणून ओळख निर्माण झालेले डॉ. बी. पी. रोंगे सर हे सांगोला तालुक्यातील शिक्षकांशी थेट संवाद साधत आहेत. विशेष म्हणजे त्यांच्या भेटींना प्रचंड प्रतिसाद लाभत आहे. साधारण दिड वर्षभरापासून डॉ. बी.पी.रोंगे सरांनी पुणे विभागात असणाऱ्या पाचही जिल्ह्यांतील शाळा- महाविद्यालयांना व पदाधिकाऱ्यांना प्रत्यक्ष भेटी देवून तेथील समस्या जाणून घेतल्या. ज्याप्रमाणे स्वेरीतील विद्यार्थ्यांचे करिअर उज्वल होत आहे त्याचप्रमाणे ज्ञानदान करणाऱ्या शिक्षकांचे भविष्यही उज्वल झाले पाहिजे. डॉ. रोंगे सरांच्या रूपाने पुणे विभागाला अभ्यासू आमदार मिळणार असल्याची भावना सर्वत्र निर्माण झाली आहे. यावेळी राज्यातील शिक्षकांनी डॉ. रोंगे सरांना विजयी करण्याचा विडा उचलला आहे, हेच वाढत्या प्रतिसादावरून दिसून येते.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरी अर्थात श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूटचे संस्थापक, स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य व खेड (ता. उत्तर सोलापूर) मधील स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष डॉ. बब्रुवाहन पांडुरंग रोंगे हे शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर लक्ष केंद्रित करत असल्याचे पहायला मिळत आहे. या निमित्ताने सर्वत्र डॉ. रोंगे सरांचे भव्य स्वागत केले जात आहे. प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी शिक्षकांच्या प्रत्यक्ष भेटीच्या रूपाने प्रचारात मात्र कमालीची आघाडी घेतली असल्याचे स्पष्ट होत आहे. स्वेरीच्या स्थापनेपासून डॉ. रोंगे सरांची मुद्देसूद आणि व्यवस्थित मांडणी, प्रत्येक समस्येचा सुक्ष्म अभ्यास या धोरणांमुळे डॉ. रोंगे सरांच्या तंत्रशुद्ध अभ्यासाचा आता राज्याला फायदा होणार आहे. एकूणच डॉ. रोंगे सरांकडे शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गज मंडळीचे लक्ष लागले आहे तसेच त्यांना पाचही जिल्ह्यांतील ५८ तालुक्यांतील शिक्षकांचा भक्कम प्रतिसाद मिळत आहे. मागील वर्षभरापासून सुरू झालेल्या या काळात प्राचार्य डॉ. रोंगे सरांचे पाचही जिल्ह्यांत झंझावाती दौरे सुरु असून त्यांना सर्वत्र उस्फुर्तपणे प्रतिसाद लाभत आहे. मतदार नोंदणी पासून निवडणूकीच्या सर्व प्रक्रिया याबाबत डॉ. रोंगे सर प्रत्येक शाळेत, प्रत्येक शिक्षकांना, संस्थाचालकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भेट देवून चर्चा करत आहेत. या चर्चांना सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. यामध्ये अनेक शिक्षक संघटनांनी व पदाधिकाऱ्यांनी डॉ. रोंगे सरांना पाठिंबा दर्शविला आहे. एकूणच डॉ.रोंगे सर यांच्या स्वेरी, एसव्हीआयटी आणि स्वाईप या तिन्ही संस्थांना अल्पावधित मिळालेल्या यशामुळे शिक्षकांची अपेक्षा वाढली आहे. या पार्श्वभूमीवर सांगोला तालुक्यातील शाळा- महाविद्यालयांना भेटी देऊन डॉ. रोंगे सरांनी आपली भूमिका स्पष्ट केली. यावेळी सांगोला मधील डॉ. बी.पी रोंगे सर यांनी फॅब्रटेक टेक्निकल कॅम्पस सांगोला, शिवाजी पॉलीटेक्निक सांगोला, विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेज सांगोला, विद्या मंदिर इंग्लिश मीडियम स्कूल सांगोला, डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय सांगोला, न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज सांगोला, सांगोला महाविद्यालय सांगोला, सह्याद्री इंग्लिश मीडियम स्कूल सांगोला, ज्ञानदीप विद्यालय सांगोला, छत्रपती शिवाजी विद्यालय वाटंबरे, श्रीधर कन्या प्रशाला नाझरे, कोळा विद्यामंदिर हायस्कूल कोळा, जुनोनी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जुनोनी, महात्मा फुले विद्यालय किडबिसरी, आदर्श विद्यामंदिर जुजारपूर, राजुरी हायस्कूल राजुरी, गुरुकुल विद्यापीठ राजुरी, सोनंद हायस्कूल सोनंद, लक्ष्मीदेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सोनंद, वत्सलादेवी विद्यालय व ज्युनिअर कॉलेज जवळा, भोपसेवाडी विद्यालय भोपसेवाडी, जवाहरलाल विद्यालय घेरडी, कडलास हायस्कूल कडलास, बहुउद्देशीय कन्या प्रशाला कडलास, सरदार शामराव लिगाडे विद्यालय व ज्युनिअर कॉलेज अकोला, शिवणे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शिवणे, विद्यामंदिर वाकी - शिवणे, हलदहिवडी विद्यालय हलदहिवडी, शिरभावी हायस्कूल शिरभावी,चिंचोली माध्यमिक विद्यालय चिंचोली,श्री शिवाजी विद्यालय व ज्युनिअर कॉलेज महूद, पांडुरंग विद्यालय कटफळ आदी शाळांना भेटी दिल्या तर स्वेरीच्या विश्वस्त सौ. प्रेमलता रोंगे यांनी अभिजीत कदम विद्यालय मेथवडे, सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी मेथवडे, मांजरी हायस्कूल मांजरी, उत्कर्ष माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सांगोला, नाझरा विद्यामंदिर नाझरा, उत्कर्ष माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सांगोला, सिंहगड कमलापूर, विद्यामंदिर हायस्कूल व अध्यापक विद्यालय एखतपूर, माध्यमिक आश्रम शाळा डिकसळ, छत्रपती शिवाजी विद्यालय पारे, कै. काकासाहेब साळुंखे पाटील विद्यालय हांगीरगे, नराळे विद्यालय, नराळे मॉडर्न हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज घेरडी, गुरुदत्त विद्यालय वाकी -घेरडी, श्री.अशोकराव देसाई कृषी विद्यालय आलेगाव इतर शाळा व महाविद्यालयांना भेटी देऊन तेथील समस्या जाणून घेतल्या. या भेटी दरम्यान बोलताना ज्ञानयात्री डॉ.बी.पी. रोंगे सर म्हणाले की 'आज शिक्षकांसमोर अनेक प्रश्न, अडचणी व समस्या आहेत. त्या सर्व शासन पातळीवर अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडण्यासाठी मी कटिबद्ध आहे. टीईटी, जुनी पेन्शन योजना अशा अनेक समस्या आहेत, त्यांचा मी बारकाईने अभ्यास केला आहे. खरे पाहता हे प्रश्न फार पूर्वी सुटायला हवे होते परंतु उदासीनतेमुळे ते सुटलेले नाहीत. यासाठी जर आपण सेवा करण्याची संधी दिली तर जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिक प्रयत्न करून अनुत्तरीत प्रश्न सोडविण्यासाठी कोठेही कमी पडणार नाही.' अशी ग्वाही त्यांनी दिली. या कारणांमुळे सर्वत्र डॉ. रोंगे सरांना प्रतिसाद मिळत असल्याचे स्पष्ट होते. आमदार होण्यापूर्वीच त्यांनी कांही प्रश्न सोडविले आहेत त्यामुळे डॉ. रोंगे सरांकडे पुणे विभागातील शिक्षक आशेने पाहत आहेत, हे मात्र नक्की जाणवते.

# अखेर रांका अन् दास यांना यांना जामिन मिळाला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: कॉकरोच जनता पार्टीचे नेते सौरव दास आणि आशुतोष रांका यांना अखेर जामीन मिळाला आहे. दिल्ली पोलिसांनी दोघांची कोठडी तीन दिवसांनी वाढवून मिळावी, अशी मागणी केली होती. पण न्यायालयानं ती अमान्य केली. दोघे ८ दिवसांपासून न्यायालयीन कोठडीत होते. जंतरमंतरवर तिरंगा फडकावल्याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली होती.

सीजेपीचे नेते सौरव दास आणि आशुतोष रांका यांना सुनावण्यात आलेली न्यायालयीन कोठडी आज संपली. त्यामुळे दोघांना सुनावणीसाठी डएच् कोर्टात हजर करण्यात आलं होतं. न्यायालयीन कोठडी वाढवल्यावर दास आणि रांका यांनी दिल्ली उच्च न्यायालयातही धाव घेतली होती. त्यांच्या याचिकांवर आज सुनावणी झाली. यावेळी उच्च न्यायालयानं दोन्ही नेत्यांना सुनावलं. मॅजिस्ट्रेट कोर्टात प्रकरण प्रलंबित असताना तुम्ही दिल्ली न्यायालयात का आलात, अशी विचारणा उच्च न्यायालयाकडून करण्यात आली. यानंतर दोघांनी त्यांच्या याचिका मागे घेतल्या.

कायद्यात अपील आणि अन्य पर्याय असताना याचिकाकर्ते थेट घटनेच्या कलम २२६ च्या अंतर्गत न्यायालयात का आले, हा प्रश्न उच्च न्यायालयानं सुनावणी दरम्यान वारंवार उपस्थित केला. बॉण्डच्या अटींचं उल्लंघन, मॅजिस्ट्रेटच्या अधिकारांशी संबंधित कायदेशीर पैलू यावरही प्रश्न करण्यात आले. सुनावणी दरम्यान न्यायालयानं रांका आणि दास यांना त्यांचं वय विचारलं. त्यावर सौरव दास २७ आणि आशुतोष रांका ३१ वर्षांचे असल्याचं त्यांच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितलं. त्यावर हे दोघेही जेन-झी नसल्याचं न्यायालयानं म्हटलं.

कोणत्या वयाच्या व्यक्तींना मिलेनियल्स म्हटलं जातं, असा प्रश्नही न्यायालयानं उपस्थित केला.

**भिवंडीत ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन व धम्म मेळावा उत्साहात साजरा!**

**बी. एच. गायकवाड यांचे प्रतिपादन**

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची धम्मदीक्षा ही जगातील सर्वात मोठी क्रांती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी /मिलिंद जाधव

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरला ५ लाख अनुयायांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेत धम्मचक्र प्रवर्तनाचा ऐतिहासिक दिवस घडवून आणला होता. समानता, बंधुत्व आणि प्रबोधनाचा संदेश देणारा हा दिवस प्रेरणादायी ठरतो. याच अनुषंगाने

भारतीय बौद्ध महासभा भिवंडी तालुक्याच्या वतीने कवाड येथील क्रुणाल फार्महाऊस येथे मंगळवारी ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन व धम्म मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोणताही रक्तपात न करता बौद्ध धम्मदीक्षेच्या माध्यमातून जगातील सर्वात मोठी क्रांती घडवून आणली. या धम्मक्रांतीने भारतीय समाजाला स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता आणि मानवतेचा मार्ग दाखवला, असे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय सचिव बी. एच. गायकवाड यांनी केले.जगाच्या इतिहासात अनेक क्रांत्या घडल्या; मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शांततेच्या मार्गाने बौद्ध धम्माचा स्वीकार करून सामाजिक परिवर्तनाची नवी दिशा दिली. धम्मदीक्षेच्या माध्यमातून त्यांनी समाजात समता आणि बंधुभावाची भावना रुजवण्याचा संदेश दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवून आणलेली धम्मक्रांती ही भारतीय समाजाच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी घटना आहे, असेही बी. एच. गायकवाड यांनी नमूद केले.




या कार्यक्रमाला सोनबा येलवे यांचे नातू सदानंद येलवे आणि पणतू राजेश येलवे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ड. राजेश जाधव होते. तर भिवंडी तालुका महिला अध्यक्षा अश्विनीताई चन्ने यांनी स्वागताध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली. यावेळी तालुका कार्यकारिणीचे पदाधिकारी, शेकडो बौद्ध बांधव आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांना बौद्ध धम्माची दीक्षा देण्यात आली. तसेच समता सैनिक दलाचे तालुक्यातील कार्यकर्ते, धम्मप्रचार व प्रसारासाठी उल्लेखनीय योगदान देणारे मान्यवर आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी विजयादशमीच्या मुहूर्तावर नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. या ऐतिहासिक घटनेने भारतीय बौद्ध समाजाला सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा दिली. आंबेडकरी विचार समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचवणे, विचारांचा प्रसार करणे, समता व बंधुभावाची भावना दृढ करणे आणि धम्माच्या मार्गाने जीवन जगण्याची प्रेरणा देणे, हा या कार्यक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. या कार्यक्रमाचे नियोजन भारतीय बौद्ध महासभेच्या संस्कार विभाग, संरक्षण विभाग, प्रचार-प्रसार विभाग आणि पर्यटन विभाग यांच्या वतीने करण्यात आले होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# धम्मचक्र प्रवर्तन दिन हा केवळ उत्सव नसून तो बौद्धांच्या प्रगतीचा एक दिशादर्शक मार्ग आहे : शिक्षाबाई जेटीथोर

## धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या आनंदाने उत्साहाने साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड) : महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दि.१४ ऑक्टोबर १९५६ रोजी अशोक विजयादशमी दिनाचे औचित्य साधुन नागपूर येथील दीक्षाभूमीवर आपल्या लाखो अनुयायासह बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन आपणाला विज्ञानवादी बौद्ध धम्म दिला आहे.त्या दिवसापासून आपण अशोका विजयादशमी हा दिवस धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून मोठ्या आनंदाने उत्साहाने साजरा करतो परंतु धम्मचक्र प्रवर्तन दिन हा केवळ उत्सव नसून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यानी आपणाला आपल्या प्रगतीचा एक मार्ग दाखविला आहे. तेंव्हा तथागतांनी व महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेले विचार आत्मसात करून आपण कर्मकांड मुक्त व्यसनमुक्त जीवन जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे प्रतिपादन महिला उद्योजिका धाराशिव कृषी प्रोडूसर कंपणी प्रा.लि. वागदरी च्या संचालिका तथा आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्या शिक्षाबाई रमेश जेटीथोर यांनी वागदरी ता. तुळजापूर येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना केले.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी पंचशील बुद्ध विहार समिती भारतीय बौद्ध महासभा ग्राम शाखा वागदरी बी.आर.तरुण मंडळ वागदरी ता. तुळजापूर व समस्त बौद्ध बांधवांच्या वतीने अशोक विजया दशमी दिनी येथील पंचशील बुद्ध विहार समाज मंदिरात ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने सामुदायिक रित्या बुद्ध वंदना व धम्म देशना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी शिक्षाबाई रमेश जेटीथोर या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून आपणाला स्वाभिमानाने जीवन जगण्याची संधी मिळवून दिलेली आहे. तेव्हा तरुणांनी उच्च शिक्षण घेऊन आपली आणि आपल्या कुटुंबाची व समाजाची प्रगती साधण्याचा प्रयत्न करावा,महिलांनी आणि तरुणांनी आंबेडकरी चळवळीत, धम्म चळवळीत निष्ठेने सहभागी व्हावे असे आव्हाने शेवटी त्यांनी केले.

याप्रसंगी श्रामणेर चंद्रकांत वाघमारे यांचेही मार्गदर्शनपर भाषण झाले. प्रारंभी सामाजिक कार्यकर्ते रमेश जेटीथोर व महिला कार्यकर्त्या शिक्षाबाई रमेश जेटीथोर यांच्या शुभहस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून सामुदायिकरित्या त्रिशरण पंचशील (बुध वंदना) घेवून अभिवादन करण्यात आले. या सर्व कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन रिपाइं (आठवले)चे धाराशिव जिल्हा सचिवएस.के.गायकड यांनी केले.

यावेळी पंचशील बुद्ध विहार समितीचे अध्यक्ष तथा माजी सरपंच नागनाथ बनसोडे ज्येष्ठ कार्यकर्ते कल्लाप्पा वाघमारे, अनिल वाघमारे, शिवाजी वाघमारे जयंती उत्सव कमिटीचे उपाध्यक्ष दीपक वाघमारे बाळू वाघमारे, सुर्यकांत कुंडलिक वाघमारे, लक्ष्मण झेंडारे, मुकेश धाडवे, जेष्ठ कार्यकर्ते कुंडलिक वाघमारे, भारतीय बौद्ध महासभा ग्राम शाखा वागदरीच्या उज्वला वाघमारे कविता गायकवाड, श्रीदेवी वाघमारे, कमल धाडवे, ठकुबाई वाघमारे,स्वाती गायकवाड, सुषमा वाघमारे, विजयाबाई वाममारे, सोजराबाई वाघमारे, कल्पना वाघमारे, गेंदाबाई बनसोडे, भाग्यश्री वाघमारे,ज्येष्ठ महिला कार्यकर्त्या कमळाबाई वाघमारे, सिमिंताबाई वाघमारे, राधाबाई वाघमारे सह ग्रामस्थ,युवा कार्यकर्ते, महिला, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## दुष्काळामध्ये मनसे धावून आली, प्रभाग १७ मध्ये दिलीप बापू धोत्रे यांच्या वतीने मोफत तीन टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर - महाराष्ट्रामध्ये प्रचंड दुष्काळाची परिस्थिती असून पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे.

पंढरपूर शहरातील एक दिवसात पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांचे हाल होत आहेत तोंडावर दसरा दिवाळी सण असून बाहेरगावी असलेली नागरिक सणासाठी घरी आले आहेत मात्र, पाण्याच्या अभावी त्यांची गैरसोय होत आहे.

ही परिस्थिती लक्षात घेऊन सामाजिक बांधिलकी म्हणून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मनसेने ते दिलीप बापू धोत्रे यांच्या वतीने प्रभाग क्रमांक १७ मध्ये आजपासून तीन टँकरद्वारे मोफत पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

जोपर्यंत पाण्याची परिस्थिती सुरळीत होत नाही तोपर्यंत या प्रभागातील सर्व नागरिकांना टँकरद्वारे मोफत पाणीपुरवठा केला जाणार असल्याची दिलीप बापू धोत्रे यांनी सांगितले.

यावेळी सचिन बंदपट्टे, गणेश पिंपळनेर, दिनेश पांढरे, रवी सरोगवड, दादा घोडके, लक्ष्मण रणदिवे, अंबादास वायदंडे, संतोष वाघमारे, संतोष गायकवाड, लखन भांडेकर, पप्पू बनपट्टे, पप्पू करपे बहुमाने, सुदर्शन खंदारे, श्रीकांत शिंदे, नागेश इंगोले भारत पवार प्रसाद यादव, रंजीत बनवडे, बापू खिलारे, अधिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इंटरनॅशनल रिस्क रिडक्शन डे निमित्त देवी भक्तांनी गिरविले आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर प्रतिनिधी : फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा यांच्या वतीने इंटरनॅशनल रिस्क रिडक्शन डे निमित्त आपत्ती व्यवस्थापन या विषयावर प्रबोधन व प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन सोलापूर येथील श्री. रूपा भवानी देवस्थान येथे देवी भक्तांकारिता करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस निरीक्षक सचिन यादव यांच्या हस्ते करण्यात आले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामीण प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. श्रीकांत येळेगावकर हे होते. यावेळी नगरसेवक विनायक विटकर, स्वीकृत नगरसेवक ज्ञानेश्वर मॅकल, श्री. रूपाभवानी मंदिर समितीचे ट्रस्टी मल्लिनाथ मसरे, पोलीस निरीक्षक विजय खोमणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक नागेश येणपे, सागर बामणे, गणेश इंगळे, राधा जेऊघाले आधी पोलीस अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे आपदा मित्र रामचंद्र वाघमारे व बजरंग व्हटकर, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, गीतगंगा सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष व्यंकटेश कंची, वैद्यकीय अधिकारी डॉ. कविता चंडक आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक विजय खोमणे म्हणाले की, श्री. रूपा भवानी देवस्थान येथे दरवर्षी नवरात्र महोत्सवात सोलापूर शहर व जिल्ह्यातील तसेच तेलंगाना, आंध्र व कर्नाटक आदी राज्यातील भाविक लाखोंच्या संख्येने दरवर्षी दर्शनासाठी येत असतात. भाविकांच्या या लोंढ्याला नियंत्रित करण्यासाठी पोलिसांना जिकरीचे काम करावे लागते. एखादी अफवा किंवा गैरसमज मोठ्या आपत्तीला आमंत्रण देऊ शकते याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे मांढरदेवी येथील भाविकांच्या मोठ्या प्रमाणात झालेल्या चेंगराचेंगरीचे उदाहरण आहे. म्हणूनच येणाऱ्या भाविकांसाठी आपत्ती व्यवस्थापनाची प्रबोधन व प्रात्यक्षिक महत्त्वाचे आहे.

आपदा मित्र रामचंद्र वाघमारे व बजरंग व्हाटकर यांनी देवी भक्तांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक व प्रबोधन केले. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याने याचा परिणाम वृद्ध, महिला व लहान बालकांवर मोठ्या प्रमाणात होतो. यामुळे हृदयविकाराचा धोका उत्पन्न झाल्यास तत्काल सी.पी.आर. देता यावे यासाठी श्री.रुपाभवानी देवी मंदिर परिसरात कार्यरत असलेल्या स्वयंसेवकांना प्रशिक्षण दिले.

अध्यक्ष समारोप करताना डॉ. श्रीकांत येळेगावकर म्हणाले की, आपत्ती ही सांगून येत नाही तर ती अचानक येते अशा परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी स्वयंसेवकाने तयार असले पाहिजे. आणि महत्वाचे म्हणजे आपत्ती येऊच नये यासाठी सुयोग्य पूर्व नियोजन महत्त्वाचे आहे.

आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात हजारो भाविकांनी व स्वयंसेवकांनी आपत्ती व्यवस्थापनाच्या मार्गदर्शनाचा व प्रात्यक्षिकांचा याचा लाभ घेतला. या कार्यक्रमात गीतगंगा सोशल फाऊंडेशन, सारथी युथ फाऊंडेशन, सखी वन स्टॉप सेंटर, रोटरी क्लब ऑफ सोलापूर, सोलापूर महानगरपालिका आरोग्य विभाग, जिल्हा शलचिकेचा कार्यालय सोलापूर जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष सोलापूर, डॉ. हेडगेवार रक्तपेढी सोलापूर, जिज्ञासा महानगर सोलापूर, नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन सोलापूर, निमा वुमेन्स फोरम सोलापूर, दयानंद कला व विज्ञान महाविद्यालय एनएसएस विभाग, वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय समाजकार्य विभाग, हिंदू एकता मंच, विश्व हिंदू महासभा, अथर्व ज्ञानपीठ प्रतिष्ठान कोल्हापूर आदी सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांचे स्वागत मल्लिनाथ मसरे यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले, सूत्रसंचालन आकाश गायकवाड यांनी केले तर आभार व्यंकटेश कंची यांनी मानले.

## चंद्रभागा वाळवंटातून २३ टन कचरा संकलित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर शहरातील चंद्रभागा वाळवंट परिसर स्वच्छ, सुंदर व निर्मळ ठेवण्याच्या उद्देशाने पंढरपूर नगरपरिषदेच्या पुढाकाराने आज बुधवार दि.२१ रोजी चंद्रभागा वाळवंट परिसरात विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानास विविध सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक संस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत २३ टन करा उचलला.

पंढरपूर नगरपरिषद, पालवी संस्था, कवठेकर प्रशाला नाथ चौक, विठ्ठल रुक्मिणी अध्यात्मिक वारकरी शिक्षण संस्था, वेदांत गुरुकुल, क्रेडाई पंढरपूर, तिरूपती कन्ट्रक्शन पंढरपूर, श्री जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था, त्याचबरोबर जोगदंड महाराज वारकरी शिक्षण संस्था पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने हे स्वच्छता अभियान आयोजित करण्यात आले.




या अभियानामध्ये संबंधित संस्थांचे पदाधिकारी व स्वयंसेवक, शाळांचे विद्यार्थी पंढरपूर नगरपरिषदेचे सर्व विभागाचे कर्मचारी प्रशासन, बांधकाम, पाणीपुरवठा, नगररचना, संगणक, आरोग्य, विद्युत, भांडार, उद्यान तसेच लेखा व कर विभागाचे प्रमुख व त्यांच्या अधिनस्त कर्मचारी, मुख्याधिकारी महेश रोकडे नगराध्यक्षा. प्रणिता भालके, नगरसेवक ओंकार जोशी यांनी सहभाग घेतला.

चंद्रभागा वाळवंट परिसरात राबविण्यात आलेल्या या विशेष स्वच्छता अभियानामध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा संकलित करण्यात आला. अभियानादरम्यान तब्बल २३ टन कचरा संकलित करून त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी व्यवस्था करण्यात आली. स्वयंसेवक, कर्मचारी, विद्यार्थी व नागरिकांनी श्रमदानातून परिसरातील कचरा, प्लास्टिक व इतर घनकचरा संकलित करून परिसर स्वच्छ केला. या अभियानाच्या माध्यमातून सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, प्लास्टिकमुक्त परिसर आणि पर्यावरण संवर्धनाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

दर बुधवारी आयोजित करण्यात येणाऱ्या श्रमदान व स्वच्छता अभियानात शहरातील नागरिक, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संस्थांनी सहभागी व्हावे, याबाबत उपमुख्याधिकारी रविंद्र सूर्यवंशी यांच्याशी संपर्क साधावा.



**पंढरपूर शहर स्वच्छ, सुंदर, निरोगी व निर्मळ ठेवण्यासाठी सर्व नागरिकांनी स्वच्छता अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून 'स्वच्छ पंढरपूर - सुंदर पंढरपूर' या संकल्पनेला बळ द्यावे, असे आवाहन पंढरपूर शहराच्या नगराध्यक्षा प्रणिता भालके तसेच मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी केले.**

**पंढरपूर नगरपरिषदेच्या पुढाकाराने व सामागिक संस्थांच्या सहाय्याने स्वच्छता अभियान उत्साहात संपन्न**

### 'स्वच्छता हीच विठ्ठल सेवा'चा संदेश-

**पंढरपूर हे महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थक्षेत्र असून श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी राज्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने भाविक पंढरपुरात येत असतात. चंद्रभागा नदी व वाळवंट परिसराला धार्मिक तसेच सांस्कृतिक महत्त्व असल्याने हा परिसर स्वच्छ व निर्मळ ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची आणि भाविकांची सामूहिक जबाबदारी आहे. म्हणूनचस्वच्छता हीच विठ्ठल सेवा, श्रमदानातून भक्ती आणि सहभागातून स्वच्छता या संदेशांच्या माध्यमातून नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले.**

या वाळवंटामध्ये अवघ्या महाराष्टाची क्रांती झालेली आहे. अशा या वाळवंटामध्ये काही अपप्रवृत्ती व अंधश्रध्देमूळे स्वच्छ असलेले वाळवंट अस्वच्छ होत आहे. परंतू, चंद्रभागा वाळवंट स्वच्छ रहावे याकरीता पंढरपूर नगरपरिषद व वारकरी संघटना व संस्था यांनी सहभागातून स्वच्छता अभियान राबवले जात आहे. ते कौतूकास्पद आहे. या अभियानात आमच्याही वारकरी संस्थेचे वारकरी सहभागी होऊन स्वच्छता करणार आहोत. हे स्वच्छता अभियान कायमस्वरुपी राबत राहो.

**- ह.भ.प.बंडातात्या कराडकर**
**अध्यक्ष, वारकरी शिक्षण संस्था**

असे आवाहन केले आहे.

**आमदार आवताडे यांच्या आढावा बैठकीत सूचना**

# मंगळवेढा उपसा सिंचन योजनेचा पहिला टप्पा मार्च पूर्वी सुरु करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगळवेढा प्रतिनिधी - मंगळवेढा उपसा सिंचन योजनेच्या कामास गती देण्यासाठी आमदार समाधान आवताडे यांनी योजनेची संबंधित असणाऱ्या अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक घेऊन योजनेतील अडथळे जाणून घेतले यावेळी पहिल्या टप्प्यामधील पंप हाऊस, मेन रायझिंग आणि वितरिकाची अपूर्ण कामे तात्काळ पूर्ण करा,दुसऱ्या टप्प्याचे पंप हाऊस, मेन रायझिंगचे कामही लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी नियोजन करून मार्च २०२७ च्या अगोदर दुसऱ्या टप्प्यापर्यंत पाणी निघायला हवे असे माझे नियोजन असून त्या पद्धतीने दिवसावर नियोजन करून जलद गतीने काम करा अशा सूचना आमदार समाधान आवताडे यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या.



या बैठकीला अधीक्षक अभियंता धीरज साळे, कार्यकारी अभियंता मुन्नोळी, डेप्युटी इंजिनीयर दुधाळ,जि. प. सदस्य प्रदीप खांडेकर,करुणा शिवशरण, जनार्दन शिवशरण,उपनगराध्यक्ष येताळा भगत,बाळासाहेब ताड, अंकुश पडवळे उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार आवताडे म्हणाले की,गुंजेगाव येथील हाऊसच्या कामातील अडथळ्याबाबत मा.जिल्हाधिकारी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांना सूचना दिल्या त्यांच्याकडून ही तात्काळ कार्यवाही करून अडथळे दूर करा

पहिल्या टप्प्यातील १११ कोटीची कामे असून यामध्ये पंप हाऊस बांधकाम करणे,उर्ध्वगामी नलिका क्रमांक एकचे काम सुरू करणे, शेलेवाडी येथे वितरण कुंड तयार करणे ही कामे आहेत तर दुसऱ्या टप्प्यात ७८ कोटी ४३ लाखाची कामे असून यामध्ये पंपगृह टप्पा दोन,संरक्षक भिंत, बॅलन्सिंग टँक, उर्ध्वगामी नलिका दोन लेंडवे चिंचाळे, मुख्य गुरुत्वीय नलिका व त्यावरील वितरण व्यवस्थेचे काम, तसेच योजना कार्यान्वितीकरण करणे, पाच वर्षे परिचलन,देखभाल व दुरुस्ती करून शेतकऱ्यांना प्रशिक्षणासह सर्व वितरण व्यवस्थेचे पाणी वापर संस्था स्थापन करून सर्व वितरण व्यवस्था हस्तांतरण करणे या बाबी दुसऱ्या टप्प्यातील कामात होणार आहेत अधिकाऱ्यांनी जातीने लक्ष देऊन योजना लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत त्याचबरोबर

तिसरे टप्प्यातील कामाचे टेंडर प्रक्रिया लवकरात लवकर करून घेण्याच्या सूचना दिल्या तिसऱ्या टप्प्यातील काही ठिकाणी हस्तांतरणाच्या बाबी अपूर्ण असून मोजणी तात्काळ करून देणे बाबत ही जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांना या बैठकीतून सूचना दिल्या असून यंदाच्या उन्हाळ्यात योजना कार्यान्वित करून पहिल्या दुसऱ्या टप्प्याचे पाणी सुरू करणार असल्याचेही सांगितले.

# स्वच्छतेतून विठ्ठल सेवा, उपक्रमात नगराध्यक्ष डॉ. प्रणिता ताई भालके यांचा प्रत्यक्ष सहभाग



## चंद्रभागा वाळवंट परिसरात स्वत: स्वच्छता करून दिला स्वच्छतेचा संदेश; जनसेवक नेतृत्वाचा आदर्श

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर – श्री विठ्ठलाच्या पावन नगरी चंद्रभागा नदीच्या वाळवंट परिसराची स्वच्छता राखण्याच्या उद्देशाने पंढरपूर नगरपरिषदेच्या राबविण्यात येणाऱ्या स्वच्छतेतून विठ्ठल सेवा या उपक्रमाचा लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉक्टर प्रणिता ताई भगीरथ भालके यांनी स्वतः प्रत्यक्ष सहभाग घेत स्वच्छता केली, व पांडुरंगाच्या वार असलेल्या बुधवारच्या दिवशी विविध संस्था, विद्यालय, समाजसेवक आणि भाविकांच्या सहभागातून हा उपक्रम राबवण्यात येत असून, धार्मिक नगरीत पवित्र स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन जपण्याच्या संदेश यामधून देण्यात येत आहे यावेळी नगरसेवक ओंकार जोशी यांच्यासह विविध भावी उपस्थित होते.

रपूर हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असून चंद्रभागा वाळवंट परिसराची स्वच्छ आणि सुंदर स्वरूप टिकून ठेवणे ही प्रत्येकाची जबाबदारी याच भावनेतून नगराध्यक्ष सौ प्रणिता ताई भगीरथ भालके यांनी केवळ प्रशासनाला सूचना देण्यापूर्ती भूमिका न ठेवता स्वतः स्वच्छता मोहिमेत उतरून नागरिकांसमोर कुटीतून आदर्श निर्माण केला नगराध्यक्ष कसा असावा, याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्रत्यक्ष जनतेत उतरून काम करणारे नेतृत्व अशी भावना यावेळी व्यक्त होत आहे.

य जनतेच्याऊ अडीअडचणी सम जावून घेणे व नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणे आणि शहराच्या विकासासोबतच सामाजिक बांधिलकी जपणे ही लोकनियुक्त नगराध्यक्ष प्रणिता ताई भालके यांच्या कार्यांची वैशिष्ट्य आहेत . पदाचा मान राखतानाच जनतेची असलेली नाळ कायम जोडून ठेवणे, लोकांच्या सुखदुःखात सहभागी होणे आणि जनहिताच्या कामांना प्राधान्य देणे या माध्यमातून त्यांनी जनसेवेची आपली बांधिलकी अखंडित केली आहे.

जनतेच्या हितासाठी सदैव तत्पर असणारे आणि प्रत्यक्ष कृतीतून जन-सेवेचा अर्थ स्पष्ट करणारी नेतृत्व म्हणून प्रणिता ताई भालके यांच्याकडे पाहिले जात आहे स्वच्छता ही केवळ नगरपरिषदेची जबाबदारी नसून ही प्रत्येक नागरिकांची सामाजिक जबाबदारी आहे हा संदेश त्यांच्या सहभागातून मिळतो व स्वच्छ सुंदर, सुंदर पंढरपूर आणि निरोगी पर्यावरण या संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी नागरिकांनीही अशा उपक्रमांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा असे आव्हाने या उपक्रमातून माध्यमातून करण्यात येत आहे.

श्री विठ्ठल च्या दर्शनासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून भावी पंढरपूरला येतात त्यामुळे शहरातील धार्मिक स्थळे नदीकाठ आणि वाळवंट परिसर स्वच्छ ठेवणे हे पंढरपूरच्या लौकिकाच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहे स्वच्छतेने विठ्ठल सेवा म्हणजेच स्वच्छतेच्या माध्यमातून विठ्ठलाची सेवा या भावनेतून राबविण्यात येणारा हा उपक्रम शहराच्या स्वच्छतेच्यांना ज्यांना देण्याबरोबर सामाजिक स्वभावाने जनजागृतीसाठी महत्वाचा ठरत आहे.

नगरध्यक्ष सौ प्रणिता ताई भगीरथ भालके यांच्या या उपक्रमातील प्रत्यक्ष सहभाग म्हणजे पदा-पेक्षा कर्तव्याला प्रसिद्धीपेक्षा कृतीला आणि अधिकारापेक्षा जनसेवेला महत्व देणाऱ्या नेतृत्वाचे दर्शन घडविण्यात ठरला आहे सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांची जोडलेले राहून जनतेच्या हितासाठी अविरत कार्य करण्याची भूमिका आणि शहरांच्या स्वच्छतेसाठी स्वतः पुढाकार घेण्याची वृत्ती यामुळे त्यांच्या कार्यातून जनसेवेचा सकारात्मक संदेश समाजापर्यंत पोहोचवला जात आहे.

# नवरात्रोत्सवानिमित्त श्री रुक्मिणी मातेला पारंपरिक अलंकारांचा साज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : घटस्थापनेपासून सुरू झालेल्या नवरात्र महोत्सवानिमित्त श्री क्षेत्र पंढरपूर येथील श्री रुक्मिणी मातेला पारंपरिक पोषाखासह विविध अलंकार परिधान करण्यात आले आहेत. दरवर्षीच्या प्रथा-परंपरेनुसार मातेचा साजशृंगार करण्यात आला असून, अलंकारांनी सजलेले मातेचे रूप भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे.





नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने श्री रुक्मिणी मातेला सुवर्ण मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, जवमणी पदक, चिंचपेटी, जवेच्या माळा, पुतळ्यांची माळ, मोहराची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा, मच्छ जोड, कर्णफुले, मण्या-मोत्यांच्या पाटल्या, पैंजण जोड आणि नथ आदी पारंपरिक अलंकारांनी सजविण्यात आले आहे.

नवरात्रोत्सवात श्री रुक्मिणी मातेच्या दर्शनाला धार्मिकदृष्ट्या विशेष महत्त्व असून, या काळात मंदिरात भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळत आहे. पारंपरिक पोषाख आणि अलंकारांनी सजलेल्या मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

याबाबतची माहिती श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.

# दुधनीतील भीमनगर येथे ७० वा विजयादशमी व धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी : प्रतिनिधी – निंगप्पा निंबाळ दुधनी, ता. अक्कलकोट : दुधनी येथील भीमनगरमध्ये ७० वा विजयादशमी व धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रारंभी भगवान गौतम बुद्ध आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. त्रिमूर्ती कन्स्ट्रक्शनचे मॅनेजर राजू सर आणि अक्कलकोट येथील खऊऊ अरे फायनान्सचे मॅनेजर रेवणसिद्ध वाघमारे यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांनी सामूहिक बौद्ध वंदना घेऊन भगवान बुद्धांच्या विचारांना अभिवादन केले.



धम्मचक्र प्रवर्तन दिन हा भारतीय इतिहासातील समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा संदेश देणारा महत्त्वपूर्ण दिवस आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथील दीक्षाभूमीवर लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ दरवर्षी धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा केला जातो.

**बुद्ध वंदना, पंचशील ध्वजारोहण आणि सामूहिक बौद्ध वंदनेतून समता, बंधुता व मानवतेचा संदेश**

भीमनगर येथे आयोजित कार्यक्रमातून भगवान गौतम बुद्धांचा शांती, करुणा, मैत्री आणि मानवतेचा संदेश तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समता व सामाजिक परिवर्तनाचे विचार समाजापर्यंत पोहोचविण्यात आले. पंचशील ध्वजारोहण आणि सामूहिक बौद्ध वंदनेमुळे परिसरात उत्साहपूर्ण व मंगलमय वातावरण निर्माण झाले होते.

**मान्यवरांसह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती**

या कार्यक्रमाला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, शंकर शिंगे, पिंटू लोड्डेन, पत्रकार निंगप्पा निंबाळ, खाजप्पा शिंगे, लक्ष्मण मगी, रमेश शिंगे, गुरु धोंडामनी, संतोष जन्ना, धर्म शिंगे,गौतम झळकी, लक्ष्मण रेऊर, शरणाप्पा बसवनकेरी, जयभीम बळुंडगी, विश्वास मगी, जयभीम निंबाळ, रन्ना सिन्नूर, राहुल झळकी, विश्वनाथ रेऊर, मुत्ताण गायकवाड, भीमा झळकी, उत्तम निंबाळ, शंतू जन्ना, महेश झळकी, काशिनाथ रेऊर, सम्राट झळकी, तथागत झळकी, अशोक बळुंडगी, बसू मड्याळ, राजू जन्ना, रवी परमशेट्टी, गोरखनाथ धोंडमनी, पिंटू शिंगे यांच्यासह भीमनगर व दुधनी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**भगवान गौतम बुद्धांचा शांतीचा संदेश आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समतेचे विचार आत्मसात करून समाजात बंधुता, एकता आणि सामाजिक सलोखा वाढविण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.**

# नवरात्र महोत्सव विजयादशमी दसरा : श्री विठ्ठलास अलंकार, रूक्मिणी मातेस पारंपारिक श्री.विजयालक्ष्मी पोशाख सह अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर – घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवास सुरवात सुरु झालेली आहे, या निमित्त दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे खंडेमहानवमी विजयादशमी दसरा दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये रूक्मिणी मातेस श्री.विजयालक्ष्मी पोशाख परिधान करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.











श्री विठ्ठलास श्री विठ्ठलास सोन्याची पगडी, कौस्तुभ मणी, दंडपेट्या जोड, हिऱ्याचे कंगनजोड, नामनिळाचा, नवरत्नाचा हार, मोरमंडळी, मोत्याचा तुरा, चांदीची काठी, सोन्याचे घोंगडे, सोन्याचे पितांबर, मोत्याची कंठी, हिऱ्याचे पैंजण तोडे, जवेची माळ, तुळशीची माळ, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, मोठी बोरमाळ इ. अलंकार परिधान करण्यात आलेली आहेत.

रुक्मिणी मातेस जडावाचे मुकुट, जडावाचे बाजूबंद, खड्यांची वेणी, चिंचपेटी हिरवी, हातसर जोड, पाण्याडयाचा हार, तनमणी मोठा, कोल्हापुरी साज, दशावतारी साज, सोन्याची साडी, ठुशी, मास पट्टा, शिंदे हार, जडावाचे ताणवड, चंद्र, सूर्य, बाजीराव गरसोळी, पेठयांची बिंदी, खड्यांच्या पाटल्या, मोत्याचे बाजूबंद, मत्स्य, रूळ जोड, पैंजण जोड, मोठी नथ, कर्णफुले, सोन्याचा करंडा, छत्रछामर, तोडे जोड, तारा मंडळ, चंद्रहार इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

राधिका मातेस नक्षी टोप, जवेची माळ, पुतळ्यांची माळ, जवमनी पदक, हायकोल इत्यादी अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

सत्यभामादेवीला सिद्धेश्वर टोप, पुतळ्यांची माळ, मोहरांची माळ, जवेची माळ, पुतळ्यांची माळ, चिंचपेटी तांबडी, लक्ष्मीहार इत्यादी अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

महालक्ष्मी मातेला सोन्याचे गंठण, मोत्याची कंठी एक पदरी, मोत्याची कंठी एक पदरी पाचूचा लोलक असलेली, एकदाणी, चंद्रहार पाच पदरी, चांदी छत्री, साखळ्या जोड, तुळशीची माळ इत्याधी अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

श्री. व्यंकटेशास लॉकेट, मोत्याची कंठी, इमिटेशन नेकलेस, जवेची माळ, चंद्रहार, मोत्याचा तुरा, साखळ्या जोड, सोन्याचे पितांबर, शिरपेच इत्यादी अलंकार प्रथा परंपरेप्रमाणे परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच मंदिर समितीच्या अख्त्यातरीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख करण्यात आलेले आहेत.

दि. २२ ऑक्टोबर रोजी एकादशी असल्याने श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन दर्शनरांगेतील गर्दीचे नियोजन, भाविकांच्या सुरक्षिततेसाठी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती, पिण्याच्या पाण्याची व चहावाटपाची व्यवस्था, आवश्यक ठिकाणी बॅरिकेडिंग, विद्युत व्यवस्था आणि इतर अनुषंगिक सोयी-सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी दिली.

## नळदुर्ग येथे धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त ध्वजारोहण व खिर दानाचा कायक्रम संपन्न

# पंचशीलाचे आचरण केल्यास मानवाला कल्याणाचा मार्ग मिळतो : प्रा. बनसोडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग दादासाहेब बनसोडे – डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी १४ अक्टोंबर १९५६ ला तथागतांच्या बौद्ध धम्माचा स्विकार केला.

संबंध देशाला करुणा मैत्रीचा समता आणि समानतेचा संदेश दिला या तथागंताच्या धम्मामुळे मानवाला जगण्यासाठी आयुष्य प्रेम , मैत्री , करुणा, सहानुभूती मिळते या मधुनच मानवाला प्रेरणा मिळते तथागतांचा धम्म हा कल्याणचा मार्ग सांगतो जो आचरण करे त्याचे आयुष्यात कल्याण होणार असे प्रतिपादन नळदुर्ग येथील बालाघाट शिक्षण संस्था संचलित कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथील माजी उप प्राचार्य तथा नळदुर्ग येथील नालंदा बौद्ध विहार मंडळाचे अध्यक्ष प्रा शिवाजी बनसोडे यांनी व्यक्त केले.

नळदृग शहरात नुकताच धम्म चक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार तथा बौद्धाचार्य दादासाहेब बनसोडे यांनी केले यावेळी बुद्ध बौद्ध विहार मंडळाचे सेक्रेटरी बाबूराव बनसोडे तसेच माजी नगरसेवक किशोर नळदुर्गकर यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.

प्रथमता तथागत भगवान गौतम बुद्ध डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले उपस्थित सर्व बौद्ध उपासक उपासिकांना बौद्धाचार्य दादासाहेब बनसोडे यांनी त्रिशरण पंचशील दिले यावेळी नळदुर्ग नगरीचे नगरसेवक





तथा गटनेते मारुती खारवे, सामाजिक कार्यकर्ते योगेश सुरवसे, कामगार युनियन अध्यक्ष खंडु गायकवाड, युवा नेते योगेश दुरुगकर, सामाजिक कार्यकर्ते अतुल बनसोडे , रुषीकेश कांबळे, बिटू कांबळे, रिपाईचे नेते महादेव कांबळे, सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल बापू बनसोडे , फुलचंद सुरवसे, कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथील प्रा अभिजीत लोखंडे, अमोल कांबळे, सविताताई नळदुर्गकर, आम्रपाली लोखंडे, रंजनाताई गायकवाड, संगीताताई बनसोडे, उषाताई कांबळे, छायाताई बनसोडे ओमप्रकाश बनसोडे, सम्यक बनसोडे अदिजनांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न करण्यात आला यावेळी उपस्थित बौद्ध उपासक व उपासकाना खिर दान करण्यास आली.